ARTHA Room 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख ३ ऑक्टोबर, १९५६ अंक ४०

## विविध माहिती

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—हैद्राबाद येथील प्राग टूल्स कॉर्पोरेशनमध्यें १ कोटी रुपये गुंतविण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें बरेंच भांडवल राज्य सरकारनें उभारलेलें आहे. ह्या कारखान्यांत मुख्यतः यांत्रिक हत्यारें तयार करण्यांत येतात. विस्ताराच्या योजनेंत विमानांचे कांहीं भाग तयार करण्याची सोय होईल.

**वारसा कराची रक्कम**—भारतांत ऑक्टोबर १९५३ पासून वारसा कराचा कायदा अंमलांत आला. तेव्हांपासून चालू वर्षअखेरपर्यंत ५ कोटी रुपये कर वसूल करण्यांत येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. कायदा अमलांत आणल्याच्या पहिल्या वर्षी ८० लाख रुपयांचा कर वसूल करण्यांत आला होता. चालू वर्षी २॥ कोटी रुपये जमा होतील अशी अपेक्षा आहे.

**उत्तर प्रदेशांत साखरेचा कारखाना**—उत्तर प्रदेशांतील सहराणपूर ह्या जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्याची परवानगी देण्यांत आली आहे. कारखान्यांत रोज १००० ते १२०० टन ऊंस गाळणारी यंत्रसामुग्री बसविण्यांत येईल. ह्या भागांत वहातूक व उसाचा पुरवठा ह्या दोन्हींची अनुकूलता आहे.

**नद्यांचें पाणी वळविण्याची योजना**— तामीलनाड भागांतील जमिनीला पाण्याचा पुरवठा करता यावा म्हणून आंध्र राज्यांतील कृष्णा व गोदावरी ह्या नद्यांचें पाणी वळविण्याच्या योजनेचा भारतीय सरकार विचार करीत आहे. योजना अंमलांत आणण्यासाठी २०० कोटी रुपये लागतील. खर्चापैकी कांहीं रक्कम पुरविण्याची तयारी मद्रास राज्यातर्फे दाखविण्यांत आली आहे.

**परदेशीय तंत्रज्ञांना सवलती**—भारतांत काम करणाऱ्या परदेशीय तंत्रज्ञांना करांच्या बाबतींत कांहीं सवलती देण्याचा भारतीय सरकारचा विचार असल्याचें समजतें. कुशल तंत्रज्ञांची भारताला आज फार गरज आहे. असे लोक देशांत काम करण्यास यावेत म्हणून अगर असलेल्यांना उत्साह वाटावा म्हणून अशा प्रकारच्या सवलतींची गरज असल्याचें सांगण्यांत येत आहे.

**मेटुर येथील अॅल्युमिनमचा कारखाना**—सालेमपासून ३० मैलांवर असलेल्या मेटुर ह्या गांवीं अल्युमिनमचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी १२ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. कारखान्यासाठी लागणारी ३०,००० किलोवॅट वीज पुरविण्याचें मद्रास सरकारनें कबूल केलें आहे. पूर्ण उत्पादन होऊं लागल्यावर कारखाना दरसाल १०,००० टन अल्युमिनम तयार करूं शकेल.

**भारत व इजिप्त ह्यांचा व्यापार**—भारताशीं व्यापारी करार करण्याची बोलणीं करण्यासाठी इजिप्तचें प्रतिनिधिमंडळ भारतांत येणार आहे. सुएझ कालव्याचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर इजिप्तनें पौंडाच्या कक्षेंतील देशांशीं होणारा व्यापार शक्य तितका कमी करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटननें इजिप्तची पौंडी गंगाजळी गोठविल्यावर भारतानें इजिप्तला ५ कोटी रुपयांचें कर्ज दिलें आहे.

**खनिज तेलाचा शोध**—भारतामधील खनिज तेलाचा शोध लावण्याच्या कामीं भारतीय सरकारला कॅनडाच्या सरकारची मदत मिळण्याचा संभव आहे. तेलासाठी सुसज्ज विमानांच्या साह्यानें पहाणी करण्याच्या कार्यांत कॅनडा सहकार्य करील. ह्या बाबतींत कॅनडामधील तंत्रज्ञांना चांगला अनुभव आहे. गेल्या तीस वर्षांत अल्प खर्चांत व थोड्या वेळांत तेलाचा शोध करण्याचें तंत्र त्यांनीं आत्मसात केलेलें आहे.

**भिकाऱ्यांना काम देणारी संस्था**—नगर जिल्ह्यांतील श्रीगोंदें तालुक्यांतील विसापूर येथील ‘भिकारी गृहा’ ला मुंबई सरकारनें ३५० एकर जमीन दिली आहे. ह्या गृहांत धडधाकट भिकाऱ्यांना पैसा मिळविण्यास उपयुक्त असा एखादा धंदा शिकविण्यांत येतो. त्याशिवाय संस्थेला सरकारतर्फे दरसाल १,५०,००० रुपयांची मदतहि देण्यांत येत असते.

**अल्प बचतीच्या कार्यक्रमाचें महत्त्व**—नॅशनल सेव्हिंग्ज कमिशनर श्री. मलहोत्रा ह्यांनीं असे उद्गार काढले कीं ह्यापुढें अल्प बचतीच्या योजनेचा प्रचार भूदानाच्या तीव्रतेनें करण्यांत आला पाहिजे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या मार्गानें २४० कोटी रुपये मिळविण्यांत आले. दुसऱ्या कार्यक्रमाच्या अवधींत ५०० कोटी रुपयांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

**स्फोटकाचा कारखाना**—भंडाऱ्यापासून ५ मैलांवर असलेल्या अंभोरा ह्या गांवीं स्फोटकाचा कारखाना काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यासाठी ३२ कोटी रुपये भांडवल लागेल. कारखान्यासाठी पांच चौरस मैलांची जागा मुक्रर करण्यांत आली आहे. जागा ताब्यांत घेण्याची कायदेशीर व्यवस्था मुंबई राज्य सरकार करील.

**सुताची सहकारी गिरणी**—सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी सुताची एक गिरणी बिहार राज्यांत नोंदविण्यांत आली आहे. विणकरांच्या सहकारी संस्था, सुताच्या सहकारी संस्था आणि त्यांचे कामगार संघ ह्यांनाच सभासद होण्याची परवानगी आहे. गिरणीचें खेळतें भांडवल सुमारें ७० लाख रुपये असेल.

## भांडवलांतील वांटणी म्हणजे डिव्हिडंड नव्हे !

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा

नोव्हेंबर १९४८ मध्यें बाई गोमतीबाई ह्यांनीं जयपूरच्या जनरल एजन्सी लि. ह्या कंपनीचे ३८५० ( शेअर्स ) भाग रु. ३८,५०० ला विकत घेतले. त्यासाठी बाईंनीं रु. ११,००० चें कर्ज काढलें होतें. पुढें सात महिन्यांच्या आंत कंपनी बुडाली व तिचा कारभार गुंडाळण्याचें काम ( लिक्विडेशन ) सुरू झालें. आक्टोबर १९४९ पावेतों लिक्विडेटर ह्यांनीं कंपनीचे व्यवहार मिटवून उरलेल्या भांडवलाची भागीदारांत वांटणी करून टाकली. बाई गोमतीबाईना त्यांच्या भागभांडवलाबद्दल प्रथम रु. ७७,००० व नंतरच्या वांटणींत रु. २,५८९ मिळाले. अशा प्रकारें कंपनी बुडाली तरी बाईंची गुंतवलेली रक्कम तर परत आलीच पण वरती त्यांना भरपूर नफा मिळाला. रु. ७७,००० बाईंच्या हातीं आले तेव्हां, प्राप्तीकराचे अधिकाऱ्यांनीं बाईंकडे प्राप्तीकराची मागणी केली. त्यांचें म्हणणें रु. ७७,००० ह्यांतून भाग खरेदीची रक्कम वजा जातां उरलेले रु. ३८,५०० हे बाईंना कंपनीकडून मिळालेले डिव्हिडंड आहे व म्हणून त्यावर प्राप्तीकर दिला पाहिजे. ह्याउलट बाईंच्यातर्फे असें प्रतिपादण्यांत आलें कीं, बाईंच्या हातीं आलेले रु. ७७,००० व रु. २,५८९ ही भांडवलांत झालेली वाढ आहे व म्हणून ह्या कोणत्याच रकमेवर प्राप्तीकर मागतां येणार नाहीं. प्राप्तिकर–अधिकाऱ्यांनीं बाईंचें म्हणणें मान्य केलें नाहीं, तेव्हां प्रकरण ' इन्कमटॅक्स ट्रिब्यूनल 'कडे गेलें, परंतु ट्रिब्यूनलनेंहि अधिकाऱ्यांच्या मागणीसच दुजोरा दिला. तेव्हां 'सदरील रकमा रु. ३८,५०० व रु. २,५८३ ह्या डिव्हिडंड म्हणून अथवा धंद्यांतील नफा म्हणून ह्या प्रकरणांतील हकीगतीवरून करपात्र ठरतात काय ? ' असा प्रश्न मुंबई हायकोर्टापुढें मांडण्यांत आला. त्याचा निर्णय सरन्यायाधीश श्री. छगला व न्यायाधीश श्री. तेंडोलकर ह्यांनीं नुकताच दिला.

बाई गोमतीबाईना मिळालेले रु. ३८,५०० व रु. २,५८३ हे भांडवलापैकीं आहेत, ते डिव्हिडंडचे रुपये नाहींत असा न्यायमूर्तींनीं निर्णय दिला. सदरचें भागभांडवल हे गोमतीबाईच्या धंद्याचा माल ( स्टॉक इन् ट्रेड ) आहे असें ट्रिब्यूनलनें ठरविलें होतें व बाईंनीं कर्ज काढून भाग खरेदी घेतले होते व पुढें सात महिन्यांत कंपनी बुडाली हीं कारणें त्यासाठी पुढें केलीं होतीं. हायकोर्टानें ट्रिब्यूनलचें हें म्हणणें अमान्य केलें. कंपनी सात महिन्यांत बुडाली ह्याचेशीं बाईचा कांहीं संबंध नाहीं व केवळ कर्ज काढल्यामुळें भागभांडवलांत गुंतवलेली रक्कम धंद्यासाठी गुंतवली असें ठरत नाहीं, असा निर्णय हायकोर्टानें दिला व बाईंना मिळालेला जादा लाभ कोणत्याहि कारणानें करपात्र ठरत नाहीं असें मत हायकोर्टानें नमूद केलें. खूप मोठा लाभ झाला असूनहि तो प्राप्तीकराच्या कक्षेंत येत नाहीं असे थोडे प्रसंग येतात अशा विरळा प्रसंगापैकीं हा प्रसंग आहे, असेंहि विधान हायकोर्टानें आपल्या निवाड्यांत केलें आहे.

---

### बँक ऑफ इंडिआचे बोनस शेअर्स

बँक ऑफ इंडिआच्या ३·५२ कोटी रु. गंगाजळींत २ कोटी रु. शेअर्सवरील प्रीमिअमचे आहेत. त्यांपैकी ५० लक्ष रु. चा विनियोग प्रत्येकीं ५० रु. चे १,००,००० नवे शेअर्स भागदारांना बोनस म्हणून देण्याकडे करण्यांत येईल. प्रत्येक ५ शेअर्सचा १ शेअर, अशी बोनसची वांटणी केली जाईल. ह्या बोनस शेअर्सना जानेवारी, १९५७ नंतर डिव्हिडंड मिळूं लागेल. ह्या बोनस शेअर्समुळें बँक ऑफ इंडिआचें भांडवल ५ कोटी रु. चें ५·५ कोटी रु. होईल.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

कंपनीचें कार्य कै. चं. गो. आगाशे, माजी मॅनेजिंग एजन्ट्स्, यांच्या धोरणानें व सिंडिकेटच्या भागीदारांच्या व ठेवीदारांच्या सहकार्यानें जोमानें चालू आहे.

★ नवीन हंगाम दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू होईल ★

★ मुदतीच्या ठेवी खालील शर्तींवर स्वीकारल्या जातात. ★

| | |
|---|---|
| मुदत एक वर्ष | व्याज ६ ( सहा ) टक्के |
| मुदत तीन वर्षें | व्याज ७ ( सात ) टक्के |
| मुदत पांच वर्षें | व्याज ७॥ ( साडेसात ) टक्के |

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. १६ सप्टेंबर १९५६

जगन्नाथ महाराज पंडित
चेअरमन,
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ३ ऑक्टोबर, १९५६






संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पश्चिम युरोपांतील राष्ट्रांचा बदललेला दृष्टिकोन

भारताच्या औद्योगीकरणाच्या बाबतींत पश्चिम युरोपांतील राष्ट्रांचा दृष्टिकोन अलीकडे कसा बदलला आहे ह्यासंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती श्री. एच्. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना सांगितली आहे. श्री. अय्यंगार ह्यांची स्टेट बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झालेली आहे. पण त्यापूर्वी ते भारतीय सरकारच्या व्यापार व उद्योगखात्याचे चिटणीस म्हणून काम करीत होते. हें काम करीत असतां त्यांनीं पूर्व जर्मनी, पश्चिम जर्मनी, चेकोस्लोव्हाकिआ, फ्रान्स, ब्रिटन, ऑस्ट्रिआ, स्वित्झरलंड व इटली ह्या देशांचा दौरा करून तेथील औद्योगिक परिस्थिति नजरेखालून घातलेली आहे. श्री. अय्यंगार आपले अनुभव सांगतांना म्हणाले कीं, पश्चिम युरोपांतील उद्योगपतींना भारताच्या पंचवार्षिक योजनेची चांगली माहिती आहे आणि ती यशस्वी व्हावी म्हणून मदत करण्याचीहि त्यांची तयारी आहे. १९५३ सालापर्यंत मात्र त्यांची वृत्ति निराळी होती. भारताच्या औद्योगीकरणाविषयीं त्यांना आतां निश्चितपणें अधिक आस्था वाटूं लागलेली दिसून येते. पंचवार्षिक कार्यक्रमाचा विचार करतांना भारताच्या बळकट आर्थिक स्थितीची ते दखल घेऊं लागलेले आहेत आणि वादग्रस्त अशा आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधीं भारतीय सरकारचीं मतें काय आहेत ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यांत येऊं लागलें आहे. ह्या बदलाला अनेक कारणें असूं शकतील. गेल्या कांहीं वर्षांत औद्योगिक क्षेत्रांत रशिआची स्पर्धा वाढलेली दिसून येते. मागासलेल्या राष्ट्रांना आर्थिक मदत देण्याच्या कामीं रशिया पुढें येऊं लागला आहे. त्यामुळेंहि पाश्चिमात्य राष्ट्रांचा भारतविषयक दृष्टिकोन बदललेला असण्याचा संभव आहे.

श्री. अय्यंगार ह्यांच्या दौऱ्यांत त्यांना एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून आली, ती म्हणजे पश्चिम युरोपांत स्वयंचलित कारखान्यांवर देण्यांत येणारा भर. ह्या बाबतींत पश्चिम युरोप फारच झपाट्यानें काम करीत आहे. स्वयंचलित कारखान्यांचीं कांहीं उदाहरणें तर आश्चर्यकारक आहेत. त्यांना एक मोठा कारखाना असा आढळून आला कीं, त्यांत अवघीं ६ माणसें काम करीत होतीं; आणि तींहि प्रत्येक पाळीला दोन ह्या हिशेबानें. एका पाळीला फक्त दोनच कामगार ह्या कारखान्याला पुरतात. स्वयंचलित कारखान्यांच्या उभारणीच्या बाबतींत रशिआहि जोरदार प्रयत्न करीत आहे. त्यांच्या दौऱ्यांत त्यांनीं दोन विशिष्ट औद्योगिक योजनांच्या बाबतींत परदेशीय तज्ज्ञांशीं चर्चा केली. ही चर्चा उपयुक्त तर झालीच. पण तीमधून प्रत्यक्ष फलनिष्पत्तीहि झाली. रंगाच्या कारखान्यांसंबंधीं सर्व प्रकारची तांत्रिक माहिती व सल्लामसलत देण्याची तयारी वरील देशांतील कारखानदारांनीं दाखविली. हें एक उदाहरण झालें. इतर उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि अशीच तयारी दाखविण्यांत आली. रंगाच्या उद्योगधंद्याचा विकास कसा घडवून आणावा हें सुचविण्यासाठीं इटली, जर्मनी, ब्रिटन व रशिआ ह्या चार देशांतील ह्या धंद्याचा अभ्यास करण्यांत येत आहे. रंगांच्या बाबतींत भारत जर स्वावलंबी झाला तर दरवर्षीं सुमारें २० कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ वाचूं शकेल असा अंदाज आहे. वरील चारी देशांकडून रंगाच्या कारखान्याबद्दल अहवाल येणार आहेत.

---

## स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें केलेले व्यवहार

भारतीय सरकारनें परदेशांशीं व्यवहार करण्यासाठी स्थापन केलेल्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें केलेल्या कार्याची कांहीं माहिती प्रसिद्ध झाली आहे. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत परदेशांशीं १६ कोटी रुपये किंमतीचे व्यवहार केले आहेत. कॉर्पोरेशननें परदेशांकडून आयात केलेल्या मालाची किंमत निर्यात केलेल्या मालाच्या किंमतीपेक्षा थोडी अधिक आहे. परदेशांशीं केलेल्या व्यापारी सौद्यांत बरीच विविधता दिसून येत आहे. स्पॅनिश मोरोक्को आणि स्वित्झरलंड ह्या देशांकडून स्वस्त दराचे २,००,००० टन सिमेंट विकत घेण्यांत येणार आहे. त्याशिवाय पाकिस्तान इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून १,००,००० टन आणि पोलंडकडून १,००,००० टन सिमेंटची आयात करण्यांत येणार आहे. सोव्हिएट रशिया, बल्गेरिया आणि चेकोस्लोव्हाकिआ ह्या राष्ट्रांनीं प्रत्येकीं २,००,००० टन सिमेंट पुरविण्याचे करार कॉर्पोरेशनशीं केले आहेत. ह्यापैकी निम्में सिमेंट १९५७ सालीं आयात होण्याचा संभव आहे. अमेरिकेकडून ७,००,००० टन खतें आयात करण्याची खटपट कॉर्पोरेशन करीत आहे. चालू वर्षअखेर सुमारें ५०० लाख रुपये किंमतीची लोखंडाची व मँगेनीझची माती निर्यात करण्यांत येईल. हा पुरवठा करण्यासंबंधींचे बरेच करार कम्युनिस्ट व बिगर-कम्युनिस्ट राष्ट्रांशीं करण्यांत आले आहेत. जपानच्या औद्योगिक प्रतिनिधींशींहि व्यापारी वाटाघाटी चालू आहेत. जपानला भारताकडून खनिजयुक्त माती पाहिजे आहे. ह्या मालाच्या मोबदल्यांत भारताला सिमेंट, लोखंड व पोलाद पुरविण्याची जपानची तयारी आहे. उभयपक्षीं असा व्यापार सुरू झाल्यास दोन्ही देशांच्या वाहतुकीच्या खर्चांत बचत होईल.

---

## अन्नधान्यावर नियंत्रणें येणार नाहींत

भारतीय सरकारच्या अन्नखात्याचे उपमंत्री श्री. कृष्णप्पा हे बंगलोर येथें गेले असतांना त्यांनीं वाजवी किंमतीला अन्नधान्य विकणाऱ्या पहिल्या दुकानाचें उद्घाटन केलें. बंगलोरच्या कॉर्पोरेशनतर्फे अशीं दुकानें काढण्यांत येत आहेत. ह्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. कृष्णप्पा म्हणाले कीं भारतामधील व्यापाऱ्यांनीं अन्नधान्याचें वितरण करण्याच्या कामीं सरकारशीं सहकार्य करावें; केवळ सुलभ रीतीनें पैसा मिळविण्यावर आपलें लक्ष केंद्रित करूं नये. आज मी ज्या दुकानाचें उद्घाटन करीत आहें तें फार दिवस चालविण्याची पाळी येणार नाहीं अशी मी आशा करतों. फारसा काळ न लागतां खुल्या बाजारांतील अन्नधान्याच्या किंमती व वाजवी किंमत घेणाऱ्या दुकानांतील

किंमती सारख्याच होतील अशी अपेक्षा आहे. अन्नधान्यांवर पुन्हां नियंत्रणें ठेवण्याचा प्रसंग टाळतां येईल असा विश्वास सरकारला वाटत आहे. देशांत चालू सालीं पाऊसपाणी चांगलें झालेलें आहे. त्यामुळें पिकें चांगलीं येतील असा अंदाज आहे. शिवाय, सरकारची इतर दृष्टीनेंहि तयारी आहे. अन्नधान्याच्या किंमती योग्य पातळीवर ठेवण्यासाठीं धान्याचा सांठा करून ठेवण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें आहे. त्यामुळें अन्नधान्याच्या किंमती भडकण्याची भीति उरलेली नाहीं. आज अशी परिस्थिति आहे कीं १९५२ सालीं देशांत अन्नधान्याचा जितका सांठा होता त्यापेक्षा अधिक सांठा सरकारजवळ आहे. त्याशिवाय परदेशांतून धान्याचे सांठे आयात करण्यांत येत आहेत. अमेरिकेकडून १५ लक्ष टन गहूं आणि ब्रह्मदेशाकडून २० लाख टन तांदूळ घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. हें धान्य भारताकडे वाटचालहि करूं लागलेलें आहे. अर्थातच नियंत्रणाचा जमाना पुन्हां येण्याची शक्यता नाहीं.

## साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीं दुकानें उघडीं ठेवतां येत नाहींत

### कायद्याबाबत खुलासा

दुकानें आणि व्यापारी कंपन्या या दोन गोष्टींत घोटाळा करूं नये आणि त्यांचें बिनचूक वर्गीकरण करून त्यांतील "दुकानें" मुंबई गुमास्ता कायद्याखालीं दुकानें म्हणून नोंदवावीं असा मुंबई सरकारनें राज्यांतील सर्व म्युनिसिपालिट्यांना सल्ला दिला आहे. त्याचप्रमाणें दुकानदारांना सदरहू कायद्याच्या २ ऱ्या परिशिष्टांतील संबंधित क्रमांकांच्या बाबतींत सूट मिळालेली असल्याशिवाय त्यांना साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीं दुकानें उघडीं ठेवतां येणार नाहींत आणि व्यापारी उलाढाल करतां येणार नाहीं, हेंहि स्पष्ट करण्यांत आलें आहे.

अलिकडील एका निकालपत्रांत (१९५५ चें अपील नं. १४४२ सरकार वि. हिरालाल सुरजकरन सारडा) मुंबई हायकोर्टानें असा निर्णय दिला आहे कीं, मुंबई गुमास्ता कायद्याच्या दुसऱ्या परिशिष्टांतील १७ व्या क्रमांकांतील तरतुदीन्वयें, जोंपर्यंत व्यापारी कंपनींतील काम, खुद्द मालक किंवा कलम १८ (१) ची ज्यांना सूट मिळाली असेल असे नोकर करीत असतील तोंपर्यंत साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीं व्यापारी कंपन्यांना काम करण्यास मुभा आहे.

वरील प्रकरणांत गूळ व इतर मालाचा व्यापार करणाऱ्या दुकानाची संबंधित म्युनिसिपालिटीनें १९४८ च्या गुमास्ता कायद्याखालीं "व्यापारी कंपनी" म्हणून नोंद केली होती. वरील निर्णयामुळें असा समज झाल्याचें दिसून येतें कीं, "व्यापारी कंपन्या" प्रमाणेंच "दुकानें" हीं १८ (१) कलमान्वयें सुट्टीच्या दिवशीं खुलीं ठेवतां येतात व व्यापार करतां येतो. तेव्हां सरकार हें स्पष्ट करूं इच्छितें कीं, सदरहू कायद्याच्या परिशिष्ट २ मधील १७ व्या क्रमांकान्वयें, कायद्याच्या कलम १३ व १८ (१) च्या बाबतींत "व्यापारी कंपन्यांना" दिली जाणारी सूट फक्त अशा कंपन्यांचे मालक व १८ (१) कलमांतून वगळलेले नोकर यांच्या हजेरीपुरतीच मर्यादित आहे. "दुकानां" च्या बाबतींत अशी सूट देण्यांत आलेली नाहीं; आणि त्यामुळें परिशिष्ट २ मधील अन्य क्रमांकातील तरतुदींची स्पष्टपणें सूट मिळाल्याशिवाय "दुकानें" सुट्टीच्या दिवशीं खुलीं ठेवतां येत नाहींत आणि त्यांना व्यापारहि करतां येत नाहीं.

**ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तू**—१८ व्या शतकांत म्हैसूरवर राज्य करणाऱ्या टिपू सुलतानाशीं संबंधित असलेल्या कांहीं वस्तू परत मिळविण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या वस्तूंच्या बदला मद्रास येथील राजभवनांत असलेले ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें तैलचित्र ब्रिटनला परत देण्यांत येणार आहे. बदली मिळणाऱ्या वस्तूंत टिपू सुलताननें वापरलेलें एक घड्याळ आहे.

**तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं सोयी**—तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या डब्यांत सध्यां ज्या सोयी आहेत, त्यांची पहाणी करून अधिक सोयी करण्यासंबंधीं सूचना करण्यासाठीं रेल्वे बोर्डानें तिघां वरिष्ठ एंजिनिअर्सची एक कमिटी नेमली आहे. पाण्याचा पुरवठा व दिव्यांची सोय ह्याबद्दलहि विचार करण्यांत येणार आहे.

**तांत्रिक शिक्षणाची संस्था**—भोपाळ येथें भारी वजनाची विद्युत्‌यंत्रसामुग्री निर्माण करण्याचा कारखाना निघणार आहे. ह्या कारखान्यासाठीं लागणारा तंत्रज्ञ नोकर-वर्ग शिकवून तयार करण्यासाठीं एक संस्था स्थापन करण्याचा भोपाळ सरकारचा विचार आहे. संस्थेसाठीं २१ लाख रुपये खर्च येणार असून तिची योजना मंजुरीसाठीं मध्यवर्ती सरकारकडे धाडण्यांत आली आहे.

**नाशिक जिल्ह्यांत रेशमाचा कारखाना**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या विकास कार्यांतील एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यांत रेशमाचा एक व कागदाचा एक असे कारखाने काढण्याची सूचना करण्यांत आली आहे. त्याशिवाय आदिवासी लोकांसाठीं ग्रामोद्योग चालूं करण्याचेंहि सुचविण्यांत आलें आहे.

**मुलांसाठीं खास इस्पितळ**—मुलांच्या रोगांवरील तज्ज्ञांचें रशिअन डॉक्टरांचें एक प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें आहे. दिल्ली येथें मुलांच्या सोयीसाठीं एक खास इस्पितळ स्थापन करण्याच्या बाबतींत त्यांचा सल्ला भारतीय सरकार घेणार आहे. मुलांच्या रोगांवर उपचार करण्याची परवानगी रशिआंतील मामुली डॉक्टर्सना नाहीं. रशिअन डॉक्टर्सच्या मतानें, त्यासाठीं वेगळ्या तज्ज्ञांची जरूर असते.


उद्यम

खेळणी विशेषांक

दिवाळीच्या सुमुहूर्तावर

ता. १ नोव्हेंबर १९५६ रोजीं प्रसिद्ध होईल.

खेळण्यांचा खप आपल्या देशांत दरवर्षी सारखा वाढत आहे. खेळणी विशेषांकांत भारतांतील व परदेशांतील विविध प्रकारच्या खेळण्यांची माहिती देण्यांत येईल. कारखानदार, व्यापारी-वर्ग, पालक व मुलें या सर्वांच्या उपयोगाची माहिती या विशेषांकांत वाचा.

उद्यम मासिक, धर्मपेठ, नागपूर १.

# लोकोत्तर उद्योगमहर्षि, श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांचें निधन

**शिक्षण व पैसा ह्यांचा अभाव आणि प्रतिकूल वातावरण व परिस्थिति, ह्यांना तोंड देऊन, कै. लक्ष्मणरावांनीं महाराष्ट्राला औद्योगिक भारतांत, देशाच्या उत्पादनवाढीस पोषक असे कारखाने काढून व वाढीस लावून, मानाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. ह्या कारखान्यांच्या तयार मालाचे सहाय्यानें इतर कारखान्यांचें व शेतीचें उत्पादन वाढून देशाच्या संपत्तींत महत्त्वपूर्ण भर पडत आहे. किर्लोस्कर कारखान्यांचें हें वैशिष्ट्य आहे.**

महाराष्ट्राचे उद्योगमहर्षि श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर हे पुणें येथें वयाच्या ८८ व्या वर्षी ता. २६ सप्टेंबर, १९५६ रोजीं निधन पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. त्यांच्या मृत्यूमुळें, उद्योगाचा सजीव आदर्श नाहींसा झाला असला, तरी त्यांनीं मागें ठेवलेले यशस्वी कारखाने व प्रगतिप्रिय आणि निष्ठावंत कार्यकर्ते ह्यांच्या प्रभावी कामागिरीमुळें, कै. लक्ष्मणरावांचें तेजस्वी स्मारक चिरकाल स्फूर्ति देत राहील.

बेळगांव जिल्ह्यांतील गुर्लहोसूर या गांवीं ता. २० जून, १८६९ रोजीं श्री. लक्ष्मणरावांचा जन्म झाला. लहानपणींच त्यांचे वडील निवर्तल्यानें त्यांचे वडील बंधू श्री. रामुअण्णा यांच्या नेतृत्वाखालीं त्यांचें संगोपन व शिक्षण झालें. शाळेच्या ठराविक अभ्यासक्रमांत श्री. लक्ष्मणरावांचें चित्त कधींच रमलें नाहीं आणि श्री. रामुअण्णांच्या प्रोत्साहनानें मुंबईंत मेकॅनिकल ड्रॉइंगचें शिक्षण घेण्यासाठी ते रवाना झाले. थोड्याच दिवसांत त्या कलेंत प्रावीण्य मिळवून मुंबईच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें ड्रॉइंग शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली.

ही नोकरी करीत असतांनाच यंत्रविषयक अमेरिकन पुस्तकें, माहितीपत्रकें, मासिकें वाचून आणि तिकडील कंपन्यांशीं पत्रव्यवहार करून वेगवेगळी यंत्रसामुग्री स्वतः तयार करण्यांत त्यांचा फुरसतीचा वेळ खर्च होई. या त्यांच्या व्यासंगानें स्टीम एंजिन हा विषय इन्स्टिटयूटच्या विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविण्यांत आली. पण नोकरींत बढतीबाबत अन्याय होत आहे असें पाहून त्यांनीं राजीनामा दिला आणि स्वतःचेंच घरगुती उद्योगालय मुंबईंत सुरू केलें. गरजू मंडळींना परदेशी यंत्रें आणवून व जोडून देणें हाहि त्यांचा जोडव्यवसाय सुरू झाला. त्याच वेळीं नव्यानें प्रचारांत आलेल्या सायकली आणवून देणें व सायकलीवर बसायला शिकविणें हाहि त्यांच्या व्यवसायाचा महत्त्वाचा भाग असे.

### बेळगांव येथील छोटा कारखाना

हे व्यवसाय जोरांत चालू असतांनाच १८९६ सालचा कुप्रसिद्ध प्लेग मुंबईवर कोसळला. तेव्हां त्यांना आपल्या सहकाऱ्यांसमवेत आपला छोटा कारखाना बेळगांव येथें आणणें भाग पडलें. १९१० पर्यंत बेळगांवांत ठळकवाडीवर किर्लोस्करांचा कारखाना व सायकल दुकान श्री. रामुअण्णांच्या साहाय्यानें सुरळीत चालू होते. येथेंच कडबा कापण्याचें यंत्र आणि लोखंडी नांगर हीं शेतीचीं अवजारें तयार करण्याचा उपक्रम यशस्वी झाला.

पण बेळगांवांतहि त्यांचा कारखाना चिरस्थायी झाला नाहीं. बेळगांव नगरपालिकेनें हा कारखाना आपल्या हद्दीबाहेर हलवावा अशी नोटीस किर्लोस्कर बंधूंना दिली. या आणीबाणीच्या प्रसंगीं श्री. लक्ष्मणरावांचे स्नेही व देशी उद्योगधंद्यांचे पुरस्कर्ते श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, अधिपति औंध संस्थान, यांनीं आपल्या संस्थानांत कुंडल रोड स्टेशनजवळ या कारखान्यासाठीं जागा व रु. १०,००० चें कर्ज देऊन कारखान्याला अमूल्य साहाय केलें. १९१० सालीं किर्लोस्करवाडी येथें कारखाना व वसाहत यांची स्थापना झाली.

त्यावेळीं कुंडल रोड जवळच्या निवडुंग्या माळावर पाणी, निवारा, संरक्षण यांच्या आवश्यक सोयीहि नव्हत्या. श्री. लक्ष्मणरावांनीं या सर्व सोयी उपलब्ध करून देऊन दहाएक वर्षांतच कारखाना व वसाहत नांवारूपास आणली. १९२० सालीं पुढील विकासासाठी लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें.

### विविध उत्पादनाचे चार कारखाने

गेल्या ३५ वर्षांत किर्लोस्कर कारखान्यानें नांगर, चरक, पंप, वगैरे सुधारलेलीं शेतीचीं अवजारें मोठ्या प्रमाणांत तयार करून देशभर त्यांचा वापर सतत प्रयत्नानें घडवून आणला. त्याचबरोबर घरगुती पोलादी सजावट सामान व हॉस्पिटलचें फर्निचर, निरनिराळ्या प्रकारचे पंप, लेथ, ड्रिलिंग मशिन्स, शेपिंग मशिन्स इ. यंत्रसामुग्री, ऑईल एंजिनें, इलेक्ट्रिक मोटर्स, आदि विविध प्रकारचा माल किर्लोस्कर कारखान्यांत तयार होऊन हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच पूर्व आफ्रिका, मध्यपूर्व, युरोप, ब्रह्मदेश, इंडोनेशिया वगैरे परदेशांतहि रवाना होऊं लागला आहे.

दुसरें महायुद्ध सुरू होण्याच्या प्रारंभींच किर्लोस्कर कारखान्याचा व्याप इतका वाढला कीं कांहीं सामुग्री तयार करण्यासाठीं स्वतंत्र कारखाने इतरत्र सुरू करणें आवश्यक झालें. त्याप्रमाणें १९४१ सालीं हरिहर येथें म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेड हा कारखाना सुरू करण्यांत आला. लहानमोठ्या कारखान्यांना आवश्यक असणारी लेथ, ड्रिलिंग व शेपिंग मशिन्स इ. मशिन टूल्स या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार होत असून तीं अव्वल दर्जाचीं असल्याची ख्याती झाली आहे.

१९४६ सालीं पुणें येथें किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड व बंगलोर येथें किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी लिमिटेड स्थापन करण्यांत आली. दोन्ही कारखान्यांचा माल १९४८ सालापासून ग्राहकांची मान्यता पावला आहे. त्याचप्रमाणें, ३० वर्षांपूर्वीं किर्लोस्करवाडींत लहान प्रमाणांत सुरू असलेला डिस्टेंपर, छपाईच्या शाया, रंग व एनॅमल्स तयार करण्याचा लकाकी वर्क्स लिमिटेड हा कारखाना लोणावळा येथें सातआठ वर्षांपूर्वीं मोठ्या प्रमाणावर चालू झाला आहे.

### किर्लोस्कर मासिकें

या चार कारखान्यांच्या औद्योगिक विकासाप्रमाणेंच महाराष्ट्राच्या बौद्धिक विकासालाहि श्री. लक्ष्मणरावांनीं फार मोठें प्रोत्साहन दिलें आहे. १९२० सालीं कारखान्याचें मुखपत्र म्हणून सुरू झालेलें 'किर्लोस्कर खबर' आतां नव्या महाराष्ट्राचें पुरोगामी मासिक 'किर्लोस्कर' म्हणून सर्व मराठी जनतेला सुपरिचित झालेलें आहे. स्त्री व मनोहर हीं त्याचीं भावंडेंहि लोकप्रिय झालीं आहेत.

श्री. लक्ष्मणरावांनीं आपल्या उद्योगशीलतेनें आणि सहकाऱ्यांच्या साहायानें घडवून आणलेला हा सर्व औद्योगिक विकास किती स्पृहणीय आहे याची भारतांत सगळ्यांना कल्पना आहे. पण ते नुसते यशस्वी कारखानदार नव्हते, तर आपल्या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तळमळीनें झटणारे राष्ट्रीय वृत्तीचे ध्येयवादी कार्यकर्तेहि होते.

अस्पृश्यतानिवारण, स्त्रियांची उन्नति आणि कामगारांचें हितसंवर्धन या बाबींकडे त्यांनीं प्रथमपासून लक्ष पुरविलें. स्वदेशीचे ते कट्टे पुरस्कर्ते असून नेहमीं खादी वापरीत असत.

शेतीचे विविध प्रयोग हा त्यांचा आवडीचा विषय असून त्याचीं प्रात्यक्षिकें त्यांनीं तुंगभद्रेच्या तीरापासून मुळामुठेच्या कांठापर्यंत तन्मयतेनें चालविलीं होतीं.

### कर्तबगार मुलांच्या नेतृत्वाखाली आणखी प्रगति

शिक्षण व संपत्ति यांचें फारसें पाठबळ नसतांहि सततोद्योग, चिकाटी व दृढनिश्चय यांच्या जोरावर एका महाराष्ट्रीय व्यक्तीनें केवळ ५० वर्षांच्या अवधींत अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि राष्ट्राचा औद्योगिक कायाकल्प घडवून आणला ही गोष्ट खरोखरीच कौतुकास्पद वाटते. किर्लोस्कर कारखान्यांवर लहानमोठ्या प्रमाणांत अवलंबून असणारे सुमारें १५-२० तरी कारखाने आज दक्षिण महाराष्ट्रांत असून त्यामुळें ५,००० पेक्षा जास्त कामगारांना रोजगार मिळत आहे. सालिना पांच-सहा कोटी रुपयांचें उत्पादन या कारखान्यांतून होत असतें.

श्री. लक्ष्मणरावांच्या मागें त्यांचे चार मुलगे असून सर्वांत थोरले श्री. शंतनुराव हे पुण्याच्या किर्लोस्कर ऑईल एन्जिन्स लि. चे जनरल मॅनेजर आहेत. दुसरे श्री. राजारामपंत हे हरिहरच्या म्हैसूर किर्लोस्कर लि. चे प्रमुख असून तिसरे श्री. प्रभाकरपंत हे किर्लोस्करवाडीच्या कारखान्यांत मोठ्या हुद्यावर आहेत. धाकटे चिरंजीव श्री. रवींद्र हे बेंगलोरच्या किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी लि. चे एक चालक म्हणून काम पहात असतात. श्री. लक्ष्मणरावांच्या कन्या सौ. सुधाताई चांदोरकर या पूर्व आफ्रिकेंत आपल्या कुटुंबियांसमवेत असतात. श्री. लक्ष्मणरावांचे एक पुतणे, श्री. शंकरराव, हे किर्लोस्कर बंधु लि. चे जनरल मॅनेजर असून किर्लोस्कर मासिकांचे संपादक आहेत.

---

**अणुशक्तीविषयक संयुक्त केंद्र**—१२ कम्युनिस्ट राष्ट्रांनीं अणुशक्तीच्या संशोधनासाठी एक संयुक्त केंद्र स्थापन केलें आहे. मो. पॅंटेकॉर्व्हो हे सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आतां ह्या मोठ्या केंद्रांत काम करूं लागणार आहेत. ५ वर्षांपूर्वी ते पश्चिम युरोपांतून गुप्तपणें रशिआला गेले होते. आतांपर्यंत ते रशिआच्या अणुशक्ति केंद्रांत काम करीत होतेच.

**टायर्स तयार करण्याचा कारखाना**—मोटारी व सायकली ह्यांना लागणाऱ्या टायर्सचा एक कारखाना काढण्याचें डनलॉप रबर कंपनीनें ठरविलें आहे. कारखाना बहुधा मद्रासजवळ काढण्यांत येईल. दक्षिण भारतामधील टायर्सची मागणी पुरविण्यासाठी त्याची योजना आहे; प्रत्यक्ष उत्पादन करण्यास दोन वर्षांचा अवधि लागेल असा अंदाज आहे.

**चित्रपटाचें यश**—पश्चिम बंगाल सरकारनें तयार केलेल्या 'पथेर पांचाली' ह्या चित्रपटाचा गौरव भारतीय सरकारनें केलाच आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबर ह्या गांधीजयंतीच्या दिवशीं फिलिपाइन्स बेटाची राजधानी मॅनिला ह्या ठिकाणीं दाखविण्यांत आला. मॅनिला येथें त्या सुमारास एक आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव आहे.

• **अमेरिकेचें ब्रम्हदेशाला कर्ज**—अमेरिकेनें देऊ केलेलें २·५ कोटी डॉलर्सचें कर्ज घेण्याचें ब्रम्हदेशाच्या सरकारनें ठरविलें आहे. कर्जाची मुदत ४० वर्षांची असून व्याजाचा दर ४½ टक्के आहे. उभयतां देश ठरवितील त्या विकासाच्या कामासाठी त्याचा विनियोग करण्यांत येणार आहे.


श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"

ह्यांचें

# पुढे पाऊल

दि. २ ऑक्टोबर, गांधी जयंति, दिवशीं प्रसिद्ध झालें.
पृ. सं. १३१. रंगीत आकर्षक मुखपृष्ठ. किं. २ रु.

प्रस्तुत लेखकाच्या "कण आणि क्षण" मध्ये मुख्यत: आजकालच्या घरगुती प्रश्नांची चर्चा करण्यांत आली होती, तर प्रस्तुत पुस्तकांत अधिक व्यापक समस्यांचा विचार प्रामुख्याने करण्यांत आलेला आहे. तरुण पिढी बिघडल्याची जाता-येता जी हाकाटी करण्यांत येते, तिचें वास्तव स्वरूप ह्या संग्रहांतील पहिल्या लेखांत स्पष्ट करून उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. दैनंदिन गृहजीवन सुव्यवस्थित व सुखी करून न थांबतां, व्यापक जीवनांतील समस्याहि जाणतेपणाने, जबाबदारीच्या भावनेने आणि आपआपल्या कुवतीप्रमाणें सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे; दोन्ही गोष्टी एकमेकाला पूरक आणि परस्परावलंबी अशाच आहेत. व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या विरोधींहि गरजांचा व हितसंबंधांचा मेळ कसा घालता येईल, हें दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. लेखकाने येथे चर्चिलेल्या प्रश्नांचें स्पष्टीकरण आणि त्यापासूनचा बोध सापेक्ष असणार, हें उघड आहे. पण हें सर्व विवेचन या ठिकाणीं केवळ नमुन्यादाखल दिलेलें असून, दैनंदिन व्यवहारांतील विविध प्रसंगांचे वेळीं त्याची आठवण ठेविली जावी, एवढीच लेखकाची अपेक्षा आहे.

पुस्तकांतील विषय

१ समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी
२ कर्तव्य करणाऱ्याला पाठीराखा पाहिजे
३ रोजच्या जीवनांतील परस्परावलंबन
४ प्रत्येक शब्दाला अर्थ असतो
५ आधी स्वतः आरशांत पाहा !
६ चांगले आणि वाईट शेजारी
७ खरी आणि खोटी काटकसर
८ हेकट म्हातारे आणि कडवट तरुण
९ संसारांतील सारंगी
१० कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप
११ वरसंशोधनाची आर्थिक मीमांसा
१२ तुम्ही अधिक चांगला पति होऊं शकता !
१३ पाहुण्यांनो, यजमानाचा चष्मा लावा !
१४ बॅडमिंटन कोर्टावरील शिष्टाचार
१५ बॉब केसांच्या हौसेचें मोल !
१६ मिश्रजीवनांतील खाचखळगे

### बार्शी सें. को. बँक लि.

" मुंबई राज्याच्या सीमेवरील बार्शीसारख्या तालुक्याच्या गांवीं सेंट्रल फायनान्सिंगचें कार्य करीत असतांना, स्थापनेपासून सतत 'अ' वर्गांत राहून सुवर्णमहोत्सव साजरा करणारी ही पहिलीच संस्था असावा." अहवालाचे सालीं, २९ एप्रिल, १९५६ रोजीं, बँकेचा सुवर्णमहोत्सव श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटानें साजरा झाला. स्थानिक मिलसच्या भारी दराच्या ठेवींची स्पर्धा, तालुक्यांतील प्रतिकूल पीकपाणी, मंदी व महागाई, अशा परिस्थितींतहि बँकेकडील ठेवी अहवालाच्या वर्षी १५ लक्ष, ८२ हजार रु. च्या १८ लक्ष रुपयांवर गेल्या. शक्यतों सोसायट्यांमार्फत सभासदांना कर्ज देण्याकडे व वसूल करण्याकडे विशेष लक्ष पुरविल्यामुळें माल तारणाव्यतिरिक्त व इतर वैयक्तिक कर्जव्यवहार ३,२६,९०४ रु. वरून २,९९,९०८ रु. वर आला. वैराग शाखेचें कामकाज व व्यवहार वाढता आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १८,७३८ रु. नफा झाला, तो गेल्या पन्नास वर्षांतील नफ्यामध्यें उच्चांक आहे. सुवर्णमहोत्सवास आलेला ३,५०० रु. वजा जाऊन हा नफा झालेला आहे. अहवालाचे पुस्तिकेवरती बँकेचे संस्थापक व सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते कै. रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ भाऊसाहेब साने ह्यांचें उत्कृष्ट छायाचित्र छापून औचित्य साधलें आहे. ६¼% डिव्हिडंडला ७,५०० रु. लागतील. ( चेअरमन : रा. गो. परांडकर. मॅनेजर : वि. ए. रेडे )

---

### कराड अर्बन को. बँक लि.

श्री. पु. पां. गोखले ह्यांची निवृत्ति, ही प्रस्तुत बँकेच्या अहवालांतील सर्वांत महत्त्वाची बाब आहे. श्री. गोखले ह्यांच्या सहकारी व राष्ट्रीय क्षेत्रांतील कार्याचा सर्वांना परिचय आहेच. त्यांनीं गेलीं दोन वर्षे " माझ्या ऐवजीं दुसऱ्या कोणाचीहि अध्यक्ष म्हणून निवड करा " अशा प्रकारें परोपरीनें सभेस विनंति केली असतांहि, त्यांच्या नेतृत्वास मुकण्यास सभासद तयार नव्हते. आतां १९५५-५६ अखेर ते क्रमानें नियामक म्हणून कमी होत असून पुनः उभेच राहात नाहींत. अहवालाचे वर्षी, ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहाससमितिवर काम करीत असल्यामुळें, वर्षभर रजेवर होते. उपाध्यक्ष श्री. वि. कृ. तांबवेकर, ह्यांनीं अध्यक्षाचें काम यशस्वी रीतीनें व जबाबदारीनें पार पाडलें आहे. बँकेचें काम दरसालप्रमाणें प्रगतिपथावर असून, खेळत्या भांडवलांत ३½ लक्ष रुपयांची वाढ झालेली आहे. तें आतां ३४,६१,५६१ रु. झालें आहे. बँकेस २५,७९३ रु. नफा होऊन भागीदारांना ६¼% दरानें डिव्हिडंड मिळेल. ( चेअरमन : पु. पां. गोखले, व्हा. चेअरमन : वि. कृ. तांबवेकर, बी. ए., एलएल्. बी., मॅ. डायरेक्टर: शं. पु. कुलकर्णी )

---

**कॅनडाकडून गव्हाची खरेदी**— इजिप्तनें कॅनडाकडून २,५०,००० टन गव्हाची मागणी केली असून कॅनडा ती पुरविण्यास तयार आहे. इजिप्तला दरसाल ६,५०,००० टनें गहूं आयात करावा लागतो. इजिप्तनें इतरहि अनेक राष्ट्रांकडून गव्हाचे साठे विकत घेतले आहेत. रशिआनें पुरविलेल्या २,००,००० टन गव्हाची किंमत इजिप्तच्या चलनांत देण्यांत आली.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

किर्लोस्कर शेंगायंत्रें




या यंत्राकडून दर तासाला ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जात असून तें चालविण्यास ६ ते ८ अश्वशक्ति लागते. याशिवाय लहान प्रमाणावर हातानें व पॉवरवर चालणारीं यंत्रें मिळतात.
"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र
सविस्तर माहितीसाठी लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स, लि., किर्लोस्करवाडी



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
राष्ट्राकरितां बचत करा.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ७,५८,४०० |
| रिझर्व | रु. | ६,९७,००० |
| ठेवी | रु. | १,५२,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा:- फोर्ट, दादर, माहिम, बेळगांव, पुणें.

## मुंबई राज्यांतील जमीन–संरक्षणाचें कार्य
### (१)

सालिना लोकसंख्येंत ४५ लक्षांची भर पडत असल्यामुळें जमिनीवर अधिकाधिक प्रमाणांत ताण पडत आहे, तेव्हां शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून अन्नोत्पादनांत वाढ करण्याची गरज तीव्र झाली आहे.

अंशतः अधिक धान्य पिकवा मोहिमेमुळें आणि पाटबंधारे, सुधारलेलीं बीं–बियाणीं, खतें, आणि सुधारलेलीं अवजारें यासंबंधींच्या योजनांमुळें आणि अंशतः चांगला पाऊस झाल्यामुळें ( मुंबई राज्यांतील कांहीं भागांत निमदुष्काळी परिस्थिति असूनहि ) अन्नोत्पादनांत हळूहळू वाढ होत आहे. मुंबई राज्यांतील आणि सबंध देशांतीलहि शेतीबाबतची परिस्थिति सुधारल्यामुळें १९५४ च्या मध्यापासून अन्नधान्यावरील नियंत्रणें व रेशनिंग हळूहळू उठविण्यांत आलें आणि १ जानेवारी, १९५५ पासून हे निर्बंध पूर्णपणें दूर करण्यांत आले.

राज्य सरकारनें शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नांत वाढ व्हावी म्हणून शक्य त्या सर्व मार्गांनीं मदत केली. सरकारनें त्यांना सुधारलेलीं बियाणीं व अवजारें पुरवलीं, पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली, पंप आणि इंजिनें घेण्यासाठी सढळपणें आर्थिक मदत दिली, जमिनविषयक धोरणांत चांगला बदल केला आणि इतर विविध प्रकारें त्यांना साह्य केलें. शेतकी प्रात्यक्षिक केंद्रांच्या द्वारेंहि शेतकीच्या कांहीं पद्धती लोकप्रिय करण्यांत आल्या. विशेषतः जपानी पद्धतीची भातशेती लोकप्रिय करण्यांत आली. कांहीं शेतकऱ्यांनीं राज्याच्या, तसेंच सबंध भारताच्याहि पीक-स्पर्धेत बक्षिसें मिळविलीं.

### निकडीचा प्रश्न

परंतु अन्नधान्योत्पादनाच्या प्रश्नाचें बरेंचसें यश जमीन संरक्षणविषयक योजनांवर अवलंबून असतें. या योजनांमुळें जमिनीची धूप थांबते, शेतांचें संरक्षण होतें, विहिरींतील पाण्याची पातळी वाढते आणि जोराच्या पावसामुळें जें जमिनीचें नुकसान होतें त्याला प्रतिबंध होतो व पुरांनाहि आळा बसतो.

हा प्रश्न अत्यंत निकडीचा असून तो ताबडतोब सोडविला गेला नाहीं तर भावी पिढ्यांचें नुकसान झाल्याखेरीज राहणार नाहीं. आतांपर्यंत किफायतशीर जमिनविषयक धोरणाच्या मार्गांत जमिनीचे छोटे छोटे तुकडे हा एक मोठाच अडथळा होता. परंतु आतां किफायशीर क्षेत्रांत त्यांचें एकत्रीकरण करण्यांत येत आहे. तसेंच शेतीसुधारसंस्था, संयुक्त शेतीसंस्था, वगैरे प्रकारच्या अनेक सहकारी सोसायट्या निघाल्यामुळें बांदबंदिस्तीचें वगैरे काम सहकारी तत्वावर करतां येईल व अर्थातच तें फायदेशीरहि होईल.

जमीनसंरक्षणाचा प्रश्न जवळ जवळ सबंध राज्यभर आहे. गुजरातमध्यें कच्छ आणि राजस्थानच्या वाळवंटाचें आक्रमण थोपविण्याचें काम करावयाचें असून मोठ्या नद्यांच्या कांठची सुपीक जमीन वाहून जात आहे त्यालाहि आळा घालावयाचा आहे. दख्खन आणि कर्नाटकांतील जमिनीची धूप होत आहे तेव्हां तिला प्रतिबंध करण्यासाठी आणि घळ्या बुजविण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. राज्याच्या पूर्वभागांत तुरळक पाऊस पडतो तेव्हां त्या भागांत जमिनींतील ओलसरपणा कसा टिकवावा हा प्रश्न आहे. पाटबंधाऱ्यांच्या साहाय्यानें जमिनी... ओलावा निर्माण करण्याचें कार्य मर्यादित प्रमाणांतच करतां ये... शक्य आहे.

राज्यांत लागवडीखालीं असलेल्या जमिनींपैकीं सुमारें ४ ट... जमीन बागायती आहे; आणि मोठ्या व छोट्या पाटबंधाऱ्यांच्... योजना पुऱ्या झाल्यानंतरहि फक्त २० टक्के इतकीच जमीन बागायतीखालीं येईल असा अंदाज आहे. याचाच अर्थ अस... कीं लागवडीजोग्या क्षेत्रांपैकीं सुमारें ⅘ क्षेत्राला पाण्यासाठीं पावसावर अवलंबून रहावें लागेल. तेव्हां पाणी टिकवून ठेवण्याच... प्रश्नहि अत्यंत महत्त्वाचा आहे.

### " थोर देशभक्त "

अमेरिकन लोकांच्या मताप्रमाणें स्वातंत्र्य–संपादनानंतर जो इसम जमिनींत घळ्या पडूं नयेत म्हणून आटोकाट प्रयत्न करील तोच थोर देशभक्त म्हटला पाहिजे. घळ्यांमुळें जमिनीचें फार नुकसान होतें. अवघ्या कांहीं वर्षांपूर्वी जेथें उत्कृष्ट शेतें होतीं तेथें आतां घळ्या पडल्यामुळें लागवड करणें अशक्य झालें आहे. दिवसेंदिवस या घळ्या रुंदावत असल्यामुळें आणि नव्या घळ्या पडत असल्यामुळें शेतजमिनीचें वाढत्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

जमिनींत घळ्या पडल्यामुळें सकस माती वाहून जाते आणि सखल प्रदेशांतील समृद्ध जमिनींत अनुत्पादक किंवा निकृष्ट जातीच्या मातीची भर पडते. शिवाय पाण्याचे साठेहि होऊन जातात व कितीतरी खर्च करून त्यांचा उपसा करावा लागतो. घळ्यांमुळें जमीन तुटते व तेथें लागवड करणें अत्यंत खर्चाचें होतें. शिवाय त्यांच्यामुळें बाजूच्या जमिनींतील ओलावा कमी होऊन त्या लौकर उजाड होतात. त्यामुळें पिकांवर अनिष्ट परिणाम होतो.

परंतु घळ्यांमुळें एवढेंच नुकसान होतें असें नाहीं. त्यांच्यामुळें सार्वजनिक सडकांचें, शेतांचें, पुलांचें आणि मोऱ्यांचें नुकसान होतें व रस्ते सुस्थितींत ठेवण्याचा खर्च वाढतो आणि प्रवाशांनाहि त्रास सहन करावा लागतो. घळ्यांशेजारीं चरणारीं गुरें घळ्यांत पडण्याचा धोका असतो.

घळ्या पडण्याचा इतिहास फार जुना आहे. मनुष्यानें प्रथम वस्ती केली त्यावेळीं येथील जंगलांची तोड केली, कोरी जमीन नांगरली व तींत लागवड केली आणि शेळ्यामेंढ्यांचे व गुरांचे कळप वाटेल तसें चरूं दिलें. त्यावेळीं जमिनीची धूप होण्यासंबंधींचा प्रश्न इतका गंभीर स्वरूपाचा नव्हता. कारण निसर्गतःच जमिनीवर जी वनस्पति वाढते तीमुळें जमिनींत पावसाचें बरेंचसें पाणी शोषलें जात असें व त्यामुळें मोठ्या प्रमाणावर धूप होत नसे. त्यानंतर जमिनींत पिकें काढण्यासाठी तीं साफसूफ करण्यांत येऊन तिची नांगरट करण्यांत आली. परंतु त्याचवेळीं जमिनींतील माती वाहून जाऊं नये म्हणून योग्य ती खबरदारी मात्र घेण्यांत आली नाहीं. डोंगर उतारावरील शेतजमिनींत उतारांची दिशा लक्षांत न घेतां लागवड करण्यांत आली. याचा परिणाम असा झाला कीं, त्यामुळें पुष्कळशी माती वाहून गेली. सुरवातीस पृष्ठभागावरील माती वाहून जाऊन तेथें छोटे छोटे ओहोळ नि... झाले व हळूहळू त्यांची वाढ होऊन घळ्या पडल्या. या घ... पुढें दर पावसाळ्यांत वाढतच गेल्या आणि त्याप्रमाणांत ... अधिक होऊं लागली.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९५१।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.